**MHGO060011572022**

<u>समरी खटला क्रमांक ७९६/२०२२</u>
<u>निशाणी क्र. ०३</u>

<u>अर्जुनी/मोरगांव येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात</u>

१) अपराध घडल्याचा दिनांक :— ०१/०७/२०२२

२) अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक :— ०१/०७/२०२२

३) फिर्याददाराचे नांव, वय व पत्ता :— सरकार तर्फे पोलिस स्टेशन अर्जुनी/मोरगांव

४) आरोपीचे नांव, वय व पत्ता :— योगराज रामकृष्ण पुस्तोडे
वय—४२ वर्षे,व्यवसाय—निरंक,
रा— देवलगांव,
ता. अर्जुनी/मोरगांव जि. गोंदिया

५) अपराधाचा तपशिल :—

दिनांक ०१/०७/२०२२ रोजी १२.५ वाजताचे सुमारास मौजा बजरंग चौक, अर्जुनी/मोरगांव येथे तुम्ही तुमचे ताब्यातील मोटारसायकल वाहन क्र. एम एच ३५ ए डी १०६८ सार्वजनिक रस्त्यावर मानवी जिवीतास धोका, दुखापत, नुकसान, पोहचविण्याचा संभव असतांना सुध्दा बेदरकारपणे, हयगयीने वाहन चालवितांना मिळून आला आणि मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला आहे.

स्वा/-

अर्जुनी/मोरगांव — **(मनोद वै. तोकले),**

दि. १९/१०/२०२२. — न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, अर्जुनी/मोरगांव
जि. गोंदिया

**६. आरोपीचे प्रतिकथन :**

प्रश्न कं. १ : फिर्यादीच्या नकला तुम्हाला मिळाल्या का ?

उत्तर : होय.

प्रश्न कं. २ : तुम्हाला आता तुमचेविरुध्दच्या आरोपाचा तपशील मातृभाषेमध्ये वाचून दाखविला तो तुम्हाला समजला का ?

उत्तर : होय.

प्रश्न कं. ३ : तुला गुन्हा कबूल आहे का?

उत्तर : होय.

----------------

आरोपीची स्वाक्षरी

समक्ष,

स्वा/-

अर्जुनी/मोरगांव **(मनोद वै. तोकले),**

दि. १९/१०/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, अर्जुनी/मोरगांव

**<u>संक्षिप्त फौ.ख.क्र.७९६/२०२२</u>**

**नि.क्र.०३ लगत**

**:: <u>न्यायनिर्णय</u> ::**

१. आरोपीने स्वच्छेने नि.क्र.०३ कडील अर्जाप्रमाणे गुन्हा कबूल केला आहे. शिक्षेबाबत त्याचे म्हणणे ऐकण्यात आले. आरोपीने यापुर्वी अशा प्रकारचा गुन्हा केला नसल्याचे कथन केले. त्याचप्रमाणे गुन्हा करुन कोणत्याही ठराविक व्यक्तीला अथवा लोकांना त्रास देण्याचा त्याचा कोणताही उ्ददेश नव्हता. म्हणून आरोपीने त्याला कमीत कमी दंड

करण्याची विनंती केली. या न्यायालयाच्या मते आरोपीने केलेल्या कथनामध्ये तथ्य आढळून येते.

२. आरोपीस त्यास देण्यात येणा-या शिक्षेबाबत विचारले असता व सदर गुन्हयांस नेमून दिलेली शिक्षा आरोपीस सांगितली असता त्याने त्याच्यावर कुटुंबाची जबाबदारी आहे, यापूर्वी कोणताही गुन्हा त्याच्याविरुध्द शाबीत झालेला नाही अथवा त्याला शिक्षा झालेली नाही त्यामुळे कमीतकमी दंडाची शिक्षा करण्याची विनंती केली. सरकारी अभियोक्ता यांनी आरोपीला आरोपीला जास्तीत जास्त दंडाची शिक्षा करणेची मागणी केली. सदर घटनेत आरोपीने केलेला गुन्हा, त्याचे स्वरुप, आरोपीचे वय, वर्तन व साक्षीदारांना झालेल्या दुखापती या सर्व बाबी विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: <u>आदेश</u> ::**

१. आरोपीला मोटार वाहन कायदा कलम १८४ या आरोपाखाली दोषी धरण्यात येत आहे.

२. आरोपीस मोटार वाहन कायदा कलम १८४ च्या अपराधाकरीता रक्कम रू.४००/-(रक्कम रूपये चारशे मात्र) दंड सुनावण्यात येते.

३. आरोपीचे बंधपत्र व जामिनपत्र रद्द करणेत येत आहे.

४. न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस विनामुल्य देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित केला.)

स्वा/-
**(मनोद वै. तोकले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अर्जुनी/मोरगांव
जिल्हा-गोंदिया

अर्जुनी/मोरगांव
दिनांक : १९/१०/२०२२.